12. I

शासकीय कार्यालयामध्ये प्राप्त झालेल्या निवेदनांवर
बारा आठवडयामध्ये कार्यवाही करण्याबाबत......

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१३/प्र.क्र. ८ /१८ (र. व का.),
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १८ जानेवारी, २०१३.

**प्रस्तावना :-**

जनतेच्या गा-हाणी व तक्रारींची तातडीने दखल घेण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-१००३/२४८/प्र.क्र.७/१८ (र.व का.) दि.२६.८.२००३ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, जनतेची शासकीय कार्यालयातील कामे / निर्णय लवकर होण्याच्या दृष्टीने शासनाने महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्याच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ राज्यात दि. ०१.०७.२००६ पासून लागू केला आहे. या अधिनियमातील प्रकरण-तीन मधील कलम १० मध्ये धारिका निकाली काढण्यासाठी कालमर्यादा निश्चित केली आहे व या कालमर्यादेचे पालन न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद केलेली आहे. परंतु या तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे मा.मुंबई उच्च न्यायलय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.६७३१/२०१२ च्या अनुषंगाने दिसून आले आहे. या याचिकेमध्ये मा उच्च न्यायलयाने श्री. राजेश के. गोडांबे यांच्या प्रकरणाच्या अनुषंगाने जनतेच्या निवेदने/अर्जांचा निपटारा शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग, क्र.संकीर्ण-०२/२०१०/प्र.क्र..२९/अ-२ दि. १६.२.२०१० मधील तरतुदीनुसार १२ आठवडयात करण्याच्या सूचना सर्वांना देण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शा स न प रि प त्र क**

१) शासनाकडे आलेल्या निवेदने/अर्जावर शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग, क्र.संकीर्ण-०२/२०१०/प्र.क्र..२९/अ-२ दि. १६.२.२०१० मधील तरतुदीनुसार १२ आठवडयात निर्णय घेऊन अंतिम उत्तर देण्यात यावे. अपवादात्मक परिस्थितीत त्या प्रकरणी १२ आठवडयात अंतिम उत्तर देणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत त्या प्रकरणी अंतिम उत्तर देणे का शक्य नाही याचा खुलासा संबंधित अर्जदारास करण्यात यावा.

२) अशी निवेदने/अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराने न्यायालयात याचिका दाखल केल्यास अशी याचिका दाखल केल्यापासून ४ आठवडयात सदर अर्जावर कोणत्याही परिस्थितीत अंतिम निर्णय घेण्यात यावा व अर्जदारास अंतिम उत्तर देण्यात यावे.

३) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात जनतेच्या निवेदने/अर्जाच्या नोंदीकरिता स्वतंत्र नोंदवही (Register) ठेवण्यात यावे.

४) उक्त नोंदवहीत नोंदविलेल्या निवेदने/अर्जांवर कार्यवाही केली जाते किंवा नाही याचा आढावा कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखाने दरमहा घ्यावा.

Scanned by CamScanner

५) दरमहा घेतल्या गेलेल्या आढाव्याचा संक्षिप्त अहवाल प्रत्येक अधिका-याने त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांकडे सादर करावा. उदा. जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांकडे, विभाग प्रमुखांनी विभागाच्या सचिवांकडे.

६) जनतेच्या निवेदने/अर्जांच्या निपटा-याबाबत अधिकारी/कर्मचारी हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असेल अगर निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असेल तर अशा अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

७) उक्त १ व २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या निवेदने/अर्जाच्याबाबत कार्यवाही करावयाची आहे. त्यामध्ये नोकरी अगर सेवाविषयक पत्रांचा अंतर्भाव करण्यात येऊ नये.

८) वरील सूचनांचे सर्व स्तरावरून काटेकोर पालन करण्यात यावे.

२. या परिपत्रकाची प्रत शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध केली असून, त्याचा संगणक क्रमांक २०१३०११८११०२५५१००७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( जयन्त कुमार बाँठिया )
मुख्य सचिव

**प्रति,**

मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
सर्व विधानमंडळ/संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मंत्रालयीन विभागातील सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन-१८.

Scanned by CamScanner